**शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे-१**

**इ.११वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०२३-२४**

**(मुंबई महानगर क्षेत्र तसेच पुणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक, अमरावती, नागपूर महानगरपालिका क्षेत्रांसाठी)**

# CAP प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक

**विशेष फेरी - 1** **(केंद्रीय प्रवेशाच्या CAP जागांसाठी)** https://11thadmission.org.in

| क्र | दिनांक व वेळ | केंद्रीय प्रवेश कार्यवाहीचा तपशील | |
|---|---|---|---|
| * | दि.१६-०७-२०२३ | उच्च माध्यमिक विद्यालयांसाठी कोटांतर्गत रिक्त जागा CAP कडे प्रत्यार्पित करण्यासाठी वेळ.<br>(व्यवस्थापन कोटा, इनहाऊस कोटा तसेच अल्पसंख्याक कोटा) | |
| १ | दि.१७-०७-२०२३,<br>स.१०:००वा पासून<br>दि.२०-०७-२०२३,<br>रात्री.१०:००वा पर्यंत | • प्रवेशासाठी पसंतीक्रम नोंदविणे, म्हणजे विशेष फेरी-१ साठी पसंती अर्ज भाग-२ ऑनलाईन सादर करणे.<br>(विद्यार्थ्यांना भाग-२ मध्ये किमान एक व कमाल १० पसंतीक्रम / विद्यालये नोंदविता येतील)<br>• नवीन विद्यार्थी ऑनलाईन नोंदणी करुन अर्ज भाग-१ भरून तो प्रमाणित करुन घेऊ शकतात.<br>• विद्यार्थ्यांना त्यांचा अर्ज भाग-१ मध्ये दुरुस्ती करता येईल. (विद्यार्थ्यांनी आपला अर्ज वेळेत लॉक करावा)<br>टीप१- केवळ भाग-१ पडताळणी झालेले विद्यार्थी भाग-२ भरू शकतात.<br>टीप२-फक्त पसंतीक्रम भाग-२ लॉक असलेले अर्ज अलॉटमेंटसाठी विचारात घेतले जातील.<br>----------<br>**संमती देणे बंधनकारक**<br>• या फेरीपूर्वी सर्वांचे पसंतीक्रम अर्ज भाग-२ अनलॉक केले जातील, जे विद्यार्थी या विशेष फेरीमध्ये सहभागी होऊ इच्छितात त्यांनी आपला पसंती अर्ज पुन्हा लॉक करणे बंधनकारक आहे. अर्थात प्रत्येक विद्यार्थ्यास ऑनलाईन संमती द्यावी लागेल.<br>• सदर प्रवेश फेरीपासून पुढील प्रत्येक फेरीसाठी विद्यार्थ्यांना पसंतीक्रम देऊन अर्ज भाग-२ लॉक करणे आवश्यक असेल त्यांचे मागील फेरीचे पसंतीक्रम कायम राहणार नाहीत.<br>• नियमित फेऱ्यांमध्ये प्रतिबंधित झालेले सर्व विद्यार्थी या फेरीमध्ये सहभागी होऊ शकतात. विशेष फेरीपासून पुढे कोणत्याही विद्यार्थ्यास प्रतिबंधित केले जाणार नाही<br>----------<br>• कोटा प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थी, ऑनलाईन कोटा प्रवेश पसंती नोंदवू शकतात. (Apply for Quota)<br>• मागील फेऱ्यांमध्ये प्रवेश झालेले विद्यार्थी, द्विलक्षी विषय प्रवेशासाठी ऑनलाईन पसंती नोंदवू शकतात. (Apply for Bifocal)<br>(कोटा तसेच द्विलक्षी प्रवेशासाठीचे वेळापत्रक स्वतंत्रपणे देण्यात आलेले आहे) | अर्ज सादर करणे |
| | | | |
| ४ | दि.२१-०७-२०२३ ते<br>दि.२३-०७-२०२३ | **DATA PROCESSING (back-end activities)**<br>पात्र उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करणे तसेच विभागीय CAP समित्यांकडून Allotment चे पूर्व परीक्षण. | |
| ५ | दि.२४-०७-२०२३,<br>स. १०:००वा. | १. विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी कनिष्ठ महाविद्यालय निवड यादी / तपशील पोर्टलवर प्रदर्शित करणे.<br>२. विद्यार्थी लॉगीन मध्ये त्याला प्रवेशासाठी मिळालेले उच्च माध्यमिक विद्यालय दर्शविणे.<br>३. संबंधित विद्यालयास प्रवेशासाठी मिळालेल्या विद्यार्थ्यांची यादी कॉलेज लॉगीन मध्ये दर्शविणे.<br>४. फेरीचे कट-ऑफ पोर्टलवर दर्शविणे. (विद्यार्थ्यांना संक्षिप्त संदेश/SMS देणे) | |
| | | | |
| ६ | दि.२४-०७-२०२३,<br>स.१०:००वा पासून<br>दि.२७-०७-२०२३,<br>सायं.०६:००वा पर्यंत | • कॉलेज लॉगीन मध्ये प्रवेश ऑनलाईन निश्चित करणे, प्रवेश रद्द करणे तसेच प्रवेश नाकारणे या प्रक्रिया सुरु राहतील.<br>• अलॉट झालेल्या उमावि/कमवि मध्ये आपला प्रवेश निश्चित करणे, (प्रवेशास जाण्यापूर्वी आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे).<br>• अलॉट झालेल्या विद्यालयात प्रवेश घ्यावयाचा असल्यास, प्रवेशाची प्रक्रिया पूर्ण करुन आपला प्रवेश तेथे निश्चित करावा (वेळापत्रकाप्रमाणे दिलेल्या वेळेत)<br>----------<br>टीपा : -<br>• जर विद्यार्थ्याला मिळालेल्या विद्यालयात प्रवेश घ्यायचा असेल तर विद्यार्थी लॉगिनमध्ये (Proceed for Admission) क्लिक करून आवश्यक कागदपत्रे अपलोड करावीत आणि अलॉट झालेल्या विद्यालयात जाऊन आपला प्रवेश निश्चित करावा.<br>----------<br>• प्रथम पसंतीक्रम मिळूनही प्रवेश घेतला नाही किंवा प्रवेश नाकारला गेला अथवा प्रवेश रद्द केल्यास अशा विद्यार्थ्यांना यापुढील कोणत्याही फेरीमध्ये प्रतिबंधित केले जाणार नाही.<br>• तथापि, विद्यार्थ्यांनी आपला प्रवेश लवकरात लवकर निश्चित करणे हिताचे आहे.<br>----------<br>• पुढील फेरीसाठी नवीन विद्यार्थी नोंदणी आणि अर्ज भाग-१ भरणे सुरू राहील.<br>(या कालावधीत फॉर्म भाग-१ मध्ये अनलॉक / दुरुस्ती करता येणार नाही)<br>• कोटांतर्गत प्रवेश तसेच द्विलक्षी विषयांसाठीचे प्रवेशाबाबत स्वतंत्र वेळापत्रकात दर्शविल्याप्रमाणे कार्यवाही करता येईल. | प्रवेश निश्चित करणे |
| ७ | दि.२७-०७-२०२३,<br>रात्री.०८:०० वा पर्यंत | प्रवेशित विद्यार्थ्यांची स्थिती पोर्टलवर ऑनलाईन नोंदविणेसाठी उच्च माध्यमिक विद्यालयांसाठी वेळ. (रात्री ०८:०० वा. पर्यंत)<br>उच्च माध्यमिक विद्यालयांसाठी कोट्यातील रिक्त जागा CAP कडे प्रत्यार्पित करण्यासाठी वेळ. (व्यवस्थापन आणि इनहाऊस कोटा) | |
| | | फेरी अखेरची रिक्त जागा जाहीर करणे. | |

सूचना-

१. प्रवेश प्रक्रियेसंदर्भातील सर्व घटकांनी दिलेल्या वेळापत्रकानुसार वेळेत सर्व प्रक्रिया पूर्ण करणे अनिवार्य राहील.

२. विशेष फेरीपासून वैधानिक आरक्षण प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर जागा खुल्या प्रवर्गातून भरण्यात येतील.

३. याफेरीनंतरही काही विद्यार्थी प्रवेश घेऊ शकले नाहीत तर त्यांचे प्रवेशासाठी कार्यवाहीचे वेळापत्रक नंतर घोषित केले जाईल.

पुणे,
दिनांक-१४/०७/२०२३

14/7

**शिक्षण सहसंचालक**
**(माध्यमिक व उच्च माध्यमिक)**

शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे-१

इ.११वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०२३-२४

(मुंबई महानगर क्षेत्र तसेच पुणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक, अमरावती, नागपूर महानगरपालिका क्षेत्रांसाठी)

# कोटांतर्गत प्रवेशाचे वेळापत्रक

प्रवेश फेरी - ४ (कोटांतर्गत जागा प्रवेशासाठी) https://11thadmission.org.in

| क्र | दिनांक व वेळ | कोटा प्रवेश कार्यवाही | |
|---|---|---|---|
| * | दि.१६-०७-२०२३ | उच्च माध्यमिक विद्यालयांसाठी कोटांतर्गत रिक्त जागा CAP कडे प्रत्यार्पित करण्यासाठी वेळ.<br>(व्यवस्थापन कोटा, इनहाऊस कोटा तसेच अल्पसंख्याक कोटा) | |
| १ | दि.१७-०७-२०२३, स.१०:००वा पासून दि.२०-०७-२०२३, रात्री.१०:००वा पर्यंत | • **इनहाऊस व अल्पसंख्याक कोटांतर्गत प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना ऑनलाईन पसंती नोंदविणेची सुविधा (Apply for quota)**<br>(जे विद्यार्थी **इनहाऊस कोटा अथवा अल्पसंख्याक** कोट्यातून प्रवेश घेऊ इच्छितात, त्यांनी विद्यार्थी लॉगिनमध्ये कोट्यासाठी ऑनलाईन Apply करणे व कोटा पसंती अर्ज लॉक करणे आवश्यक आहे.)<br>• **व्यवस्थापन कोटांतर्गत प्रवेशासाठी संबंधित कनिष्ठ महाविद्यालयांशी संपर्क करुन पुढील कार्यवाही करता येईल.**<br>• **कोटा्रतर्गत रिक्त जागा विद्यार्थी लॉगीनमध्ये पाहता येतील.**<br>---<br>• **कोटा प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना प्रत्येकवेळी पसंती नोंदविणे आवश्यक राहील मागील फेरीची पसंती यापुढे कायम राहणार नाही.**<br>• **विद्यार्थ्यांनी त्यांनी भरलेल्या भाग-१ आणि भाग-२ तसेच कोटा पसंती (Locked) अर्जांची प्रिंट काढून सोबत ठेवावी.**<br>• **या वेळेत कनिष्ठ महाविद्यालयांना सर्व कोटांतर्गत रिक्त जागा CAP कडे प्रत्यार्पित करता येतील.** | अर्ज भरणे |
| | | | |
| २ | दि.२१-०७-२०२३ ते दि.२३-०७-२०२३ | • **विद्यालयांनी कोटा पसंती दिलेल्या विद्यार्थ्यांची कोटानिहाय गुणवत्ता यादी नियमानुसार तयार करणे.**<br>(इनहाऊस कोटा आणि अल्पसंख्याक कोटा) | |
| ३ | दि.२४-०७-२०२३, स. १०:००वा. | • **प्रवेशासाठी पात्र/ निवडलेले आणि प्रतीक्षेतील विद्यार्थ्यांची यादी विद्यालय स्तरावर प्रदर्शित करणे.**<br>• **पात्र व पसंती दिलेल्या विद्यार्थ्यांच्या कोटानिहाय याद्या विद्यालयात प्रदर्शित केल्या जातील.**<br>• **निवडलेल्या विद्यार्थ्यांना कोटांतर्गत प्रवेशासाठी फोन करणे, संदेश देणे. (विद्यालय स्तरावरील कार्यवाही)** | |
| | | | |
| ४ | दि.२४-०७-२०२३, स.१०:००वा पासून दि.२७-०७-२०२३, सायं.०६:००वा पर्यंत | • **या कालावधीत** (व्यवस्थापन, इनहाऊस आणि अल्पसंख्याक) **कोटांतर्गत प्रवेश निश्चित केले जातील.**<br>कोट्यातून प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी विद्यालयात प्रदर्शित गुणवत्ता यादीनुसार आपला प्रवेश निश्चित करणे.<br>• **कनिष्ठ महाविद्यालये त्या विद्यार्थ्यांपैकी पात्र विद्यार्थ्यांना, विद्यार्थ्यांचे संमतीने संबंधित कोट्यातून गुणवत्तेनुसार प्रवेश देऊ शकतात.**<br>---<br>अल्पसंख्याक कोटा प्रवेश टीप-<br>सर्व अल्पसंख्याक प्रकारातील (भाषिक तसेच धार्मिक) विद्यार्थ्यांना प्रवेश करण्याची सुविधा उपलब्ध होईल. | प्रत्यक्ष प्रवेश घेणे |
| ५ | दि.२७-०७-२०२३, रात्री.०८:०० वा पर्यंत | **प्रवेशित विद्यार्थ्यांची स्थिती पोर्टलवर ऑनलाईन नोंदविणेसाठी उच्च माध्यमिक विद्यालयांसाठी वेळ.**<br>**उच्च माध्यमिक विद्यालयांसाठी कोट्यातील जागा समर्पित करण्यासाठी वेळ. (व्यवस्थापन कोटा आणि इनहाऊस कोटा)** | |
| | | कनिष्ठ महाविद्यालयांनी त्यांच्या स्तरावर कोटानिहाय रिक्त जागा प्रदर्शित करणे. (या प्रवेश फेरीच्या समाप्तीनंतरची स्थिती) | |

सूचना-

४. **केंद्रीकृत प्रवेश प्रक्रिया आणि कोटा प्रवेश वेळापत्रकानुसार एकाच वेळी आयोजित केले जातील.**

५. **इनहाऊस व अल्पसंख्याक कोटांतर्गत प्रवेशासाठी ऑनलाईल अर्ज करण्याची सुविधा देण्यात आलेली आहे. व्यवस्थापन कोटांतर्गत प्रवेशासाठी संबंधित विद्यालयाशी संपर्क करावा लागेल.**

६. **विशेष फेरीपासून अल्पसंख्याक कोटांतर्गत रिक्त जागा केंद्रीय प्रवेशासाठी प्रत्यार्पित् करता येतील.**

पुणे,
दिनांक-१४/०७/२०२३

शिक्षण सहसंचालक
(माध्यमिक व उच्च माध्यमिक)

**शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे-१**

**इ.११वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०२३-२४**

(मुंबई महानगर क्षेत्र तसेच पुणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक, अमरावती, नागपूर महानगरपालिका क्षेत्रांसाठी)

# द्विलक्षी विषय प्रवेशाचे वेळापत्रक

## (विशेष प्रवेश फेरी-१ सोबत द्विलक्षी प्रवेश फेरी-१)

| क्र | दिनांक व वेळ | कोटा प्रवेश कार्यवाही | |
|---|---|---|---|
| * | दि.१५-०७-२०२३<br>दि.१६-०७-२०२३ | द्विलक्षी अभ्यासक्रमांच्या विषयनिहाय उपलब्ध / रिक्त जागा विद्यालयांनी प्रदर्शित करणे.<br>द्विलक्षी विषयांबाबत प्रवेशित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन / उद्बोधन वर्ग आयोजित करणे. | |
| १ | दि.१७-०७-२०२३,<br>स.१०:००वा पासून<br>दि.२०-०७-२०२३,<br>रात्री.१०:००वा पर्यंत | • प्रवेशित विद्यार्थी, द्विलक्षी विषय प्रवेशासाठी ऑनलाईन पसंती नोंदवू शकतात.(Apply for Bifocal)<br>• द्विलक्षी अभ्यासक्रम प्रवेशासाठी पसंती विद्यार्थ्यांना या कालावधीत केव्हाही बदलता येईल तथापि, द्विलक्षी विषय प्रवेश पसंती अर्ज वेळेत लॉक करणे विसरु नका.<br>• यापूर्वीच्या कोणत्याही प्रवेश फेरीमधून प्रवेश घेतलेले विद्यार्थी त्या विद्यालयातील / तुकडीतील उपलब्ध द्विलक्षी विषय प्रवेशासाठी अर्ज करण्यास पात्र असतील. | अर्ज भरणे |
| | | | |
| ४ | दि.२१-०७-२०२३ ते<br>दि.२३-०७-२०२३ | • द्विलक्षी अभ्यासक्रम प्रवेशासाठी पूर्वतयारी करणे.<br>• प्रवेशित विद्यार्थ्यांनी द्विलक्षी विषय प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज करणे सुरु राहील. | |
| ५ | दि.२४-०७-२०२३,<br>स. १०:००वा. | • विद्यालयांनी द्विलक्षी प्रवेशासाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांच्या विषयनिहाय गुणवत्ता याद्या आरक्षण व पात्रता नियमानुसार तयार करणे आणि दर्शनी भागात प्रसिद्ध करणे.<br>• द्विलक्षी विषय प्रवेशासाठी पात्र/ निवडलेले आणि प्रतीक्षेतील विद्यार्थ्यांची यादी विद्यालय स्तरावर प्रदर्शित करणे.<br>• निवडलेल्या विद्यार्थ्यांना द्विलक्षी विषय प्रवेशासाठी फोन करणे, संदेश देणे. (विद्यालय स्तरावरील कार्यवाही). | |
| | | | |
| ६ | दि.२४-०७-२०२३,<br>स.१०:००वा पासून<br>दि.२७-०७-२०२३,<br>सायं.०६:००वा पर्यंत | • विद्यार्थ्यांनी पात्र ठरलेल्या विषयासाठी आपला प्रवेश निश्चित करणे.<br>• विद्यालयांनी द्विलक्षी विषयांचे प्रवेश निश्चित करणे आणि सदर प्रवेश पोर्टलवर अपलोड करणे. | प्रवेश घेणे |
| ७ | दि.२७-०७-२०२३,<br>रात्री.०८:०० वा पर्यंत | प्रवेशित विद्यार्थ्यांची स्थिती पोर्टलवर ऑनलाईन नोंदविणेसाठी उच्च माध्यमिक विद्यालयांसाठी वेळ. | |
| * | | कनिष्ठ महाविद्यालयांनी त्यांच्या स्तरावर रिक्त जागा प्रदर्शित करणे. (या प्रवेश फेरीच्या समाप्तीनंतरची स्थिती) | |

सूचना-

१. द्विलक्षी विषयांसाठी प्रवेश कार्यवाही विशेष फेरीपासून प्रत्येक फरीसोबत समांतपणे सुरु राहील. (केवळ प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी)

२. द्विलक्षी विषय प्रवेशासाठी व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालयाने ठरवून दिलेले नियम व कार्यपद्धती लागू असेल. त्याचे पालन होईल याची विद्यालयांनी दक्षता घ्यावी.

३. द्विलक्षी विषयांसाठी प्रवेश घेणे विद्यार्थ्यांसाठी वैकल्पिक आहेत.

पुणे,
दिनांक-१४/०७/२०२३

14/7

शिक्षण सहसंचालक
(माध्यमिक व उच्च माध्यमिक)